# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना व प्रशासन विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

email :- registrar@unigug.ac.in दुरध्वनी क्र. ०७१३२-२२३१०४ email:- establishment.section@unigug.ac.in


जा.क्र. गो.वि./आस्था./२२३२/२०२२ दि. ०१/०७/२०२२

## परिपत्रक

विषय:- **"स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव"** अंतर्गत **"हर घर झंडा"** उपक्रम राबविण्याबाबत.

संदर्भ :- महाराष्ट्र शासन, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग शासन परिपत्रक क्र. सं.८२२२/प्र.क्र.११० (भाग-२) सां.का.४, दि. २०/०६/२०२२.

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, भारतीय स्वातंत्र्याला ७५ वर्ष पुर्ण होत असल्याच्या पार्श्वभुमीवर, जनतेच्या मनात या स्वातंत्र्य लढ्याच्या स्मृती तेवत रहाव्यात, स्वातंत्र्य संग्रामातील अज्ञात नायक/ क्रातिकारक/ स्वातंत्र्य संग्रामात घडलेल्या विविध घटना यांचे स्मरण व्हावे, स्वातंत्र्यासाठी चेतवलेले स्फुल्लिंग कायम तेवत रहावे व देशभक्तीची जाज्वल्य भावना कायमस्वरुपी जनमानसात रहावी, या उद्देशाने या दैदिप्यमान इतिहासाचे अभिमानपुर्वक संस्मरण करण्यासाठी **"आजादी का अमृत महोत्सव"** अर्थात **"स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव"** अंतर्गत **दि. ११ ऑगस्ट २०२२ ते दि.१७ ऑगस्ट २०२२** या कालावधीमध्ये केंद्र शासनाच्या सूचनेनुसार **"हर घर झंडा"** हा उपक्रम राबविण्यात येत असून त्याबाबतचे संदर्भिय शासन परिपत्रक निर्गमित झाले आहे.

करीता सर्व संबंधितांनी संदर्भिय शासन परिपत्रकाचे अवलोकन करुन त्यानुसार कार्यवाही घ्यावी.

संलग्न - वरीलप्रमाणे.

1.7.2022

**(डॉ. अनिल चिताडे)**
कुलसचिव(प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रतिलिपी:-**

१. मा. कुलगुरु महोदयांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरु महोदयांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहिती तथा कार्यवाहीकरीता अग्रेषित.
४. सर्व प्रशासकिय/शैक्षणिक विभागांचे मा. विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांनी सदरहू परिपत्रक आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व अधिकारी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, कंत्राटी कर्मचारी तसेच विद्यार्थी-विद्यार्थीनी यांच्या निदर्शनास आणून द्यावे.
५. मा. संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहिती तथा कार्यवाहीकरीता अग्रेषित.
६. मा. कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई.
७. सिस्टीम ॲनालिस्ट, संगणक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना सुचित करण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.
८. जनसंपर्क अधिकारी, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली गडचिरोली यांना माहिती तथा कार्यवाहीकरीता अग्रेषित.
९. आस्थापना विभाग(नस्ती), गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**(डॉ. विजय सिलारे)**
उपकुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली